**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 21st September 2018**

**Article regarding Ganeshotsav celebrated in R. A. Podar College**

# आधी वंदू पर्यावरणाला

**पर्यावरणपूरक पद्धतीनं गणेशोत्सव साजरा करण्याची चर्चा नेहमी होत असते. पण, तो प्रभावीपणे कसा करायचा याचा आदर्श वस्तुपाठच घालून दिला पोदारच्या राजा गणेशोत्सव मंडळानं. कसा ते जाणून घेऊ.**

प्रथमेश राणे, कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

## पोदारचा इकोफ्रेंडली गणेशोत्सव



अनेक कॉलेजांच्या कॅम्पसमध्ये गणेशोत्सव साजरा होत असतो. पण पोदारचा गणेशोत्सव यंदा वेगळा ठरला. गणरायाच्या मूर्तिपासून ते सजावट, विसर्जन अशा प्रत्येक गोष्टीमध्ये पर्यावरणाचं भान राखत गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

पोदारच्या गणेशोत्सवाचं हे ७८ वं वर्ष. टाळ-मृदुंग आणि ढोल-ताशांच्या गजरात यंदा पोदारच्या राजाचं आगमन झालं. भारतीय कला आणि संस्कृतीचं दर्शन घडवणारी सजावट करण्याच्या उद्देशानं पोदारमध्ये नटराज मंदिर उभारण्यात आलं होतं. या मंदिरासाठी लागणाऱ्या सर्व विटा कागदापासून बनवण्यात आल्या होत्या. गणेशाची मूर्तीही कागदापासून बनवण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी देशभरातल्या वेगवेगळ्या कला आणि संस्कृतीचा आविष्कार घडवला. गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम पोदारमध्ये सादर झाले. निरनिराळ्या राज्यांतल्या नृत्यकला, संगीतकला सादर करण्यात आल्या. या कार्यक्रमांना कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि कलाकार माधव देवचक्के यांनी हजेरी लावली होती.

पोदार गणेशोत्सव मंडळाचा आगमन सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम याबरोबरच विसर्जनसुद्धा इकोफ्रेंडली पद्धतीनंच करण्यात आले. विसर्जनाच्या वेळी छोटी मिरवणूक काढण्यात आली. गणेशमूर्तीचं विसर्जन कॉलेजच्या आवारातच करण्यात आलं. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या आवारात त्यासाठी कृत्रिम तलाव तयार केला होता. त्या तलावातच पोदारच्या राजाचं विसर्जन करण्यात आलं. हेच पाणी झाडांमध्ये सोडण्यात आलं. कागदापासुन तयार केलेली मूर्ती असल्यामुळे त्यापासून झाडांसाठी खत निर्माण झालं. हेच खत झाडांसाठी वापरण्यात आलं. पर्यावरणाचं भान जपत साजऱ्या केलेल्या गणेशोत्सवाचं सर्वांनीच कौतुक केलं.

### रुग्णसेवेचा वसा

गणेशोत्सवासाठी जमलेल्या रकमेतला काही भाग समाजकार्यासाठी वापरण्यात येतो. पोदार गणेशोत्सव मंडळ या पैशांमधून ट्युबरक्लुसिसच्या रुग्णांना लागणारं प्रोटिन्स पुरवलं जातं. गेल्या वर्षापासून हा नवीन उपक्रम मंडळानं सुरू केला आहे. या आजारासाठी लागणारे प्रोटीन्स खूप महाग आहेत. पोदार गणेशोत्सव मंडळ या निधीमधून त्या रुग्णांना सहाय्य करतात. या वर्षीसुद्धा गणेशोत्सव मंडळ या रुग्णांना मदत करणार आहे.